आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र – संध्या ७ वाजता

३ ऑक्टोबर २०२३ – मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- नांदेडमधल्या शासकीय रुग्णालयातल्या गेल्या ३ दिवसातल्या मृतांची संख्या ३१ वर/ या सर्व मृत्यूंबाबत चौकशी करण्याची वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांची घोषणा

- राज्यभरातल्या सव्वा २ हजारांहून अधिक ग्रामपंचातींमध्ये सार्वत्रिक निवडणुकांसाठी ५ नोव्हेंबरला मतदान

- सोयाबीन पिकाचे पंचनामे सुरु करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश /कृषी पंप वीज जोडण्याचं काम वेगानं पूर्ण करण्यासाठी उच्च दाब वितरण प्रणाली योजनेला ३१ मार्च २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय

- प्रकाशाच्या अॅटोसेकंद प्लसविषयी केलेल्या संशोधनासाठी ३ शास्त्रज्ञांना यंदाचा भौतिकशास्त्रातला नोबेल पुरस्कार जाहीर

**आणि**

- आशियाई क्रीडा स्पर्धेत आज भारताला एक सुवर्ण, एक रौप्य आणि चार कांस्य पदकांची कमाई

**<><><><><>**

नांदेडमधल्या शासकीय रुग्णालयातल्या गेल्या ३ दिवसातल्या मृतांची संख्या ३१ झाली आहे. या सर्व मृत्यूंच्या कारणांची चौकशी केली जाईल, अशी माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली आहे. नांदेडचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्यासह रुग्णालयाला भेट दिल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.

**बाईट - हसन मुश्रीफ**

रुग्णालयातली रिक्त पदं तत्काळ भरली जातील. स्वच्छतेचं काम बाह्ययंत्रणेमार्फत केलं जाईल, असंही ते म्हणाले. यापुढे एकही मृत्यू होणार नाही, याची काळजी घेण्याचे आदेश दिल्याचंही त्यांनी सांगितलं.

याप्रकरणी दोषींवर कारवाई केली जाईल, असं आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलं आहे. रुग्णालयात औषधांची कमतरता नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलंय.

याप्रकरणी आरोग्यमंत्री आणि वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

**<><><><><>**

राज्यभरातल्या सुमारे 2 हजार 359 ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी, तसंच 2 हजार 950 सदस्यपदाच्या; तर 130 सरपंचांच्या रिक्तपदांच्या पोटनिवणुकांसाठी, येत्या 5 नोव्हेंबरला मतदान होणार आहे. राज्य निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान यांनी आज मुंबईत ही घोषणा केली. संबंधित ग्रामपंचायतींच्या क्षेत्रात आजपासून आचारसंहिता लागू झाली आहे, असं त्यांनी सांगितलं.

उमेदवारी अर्ज येत्या १६ ते २० तारखेदरम्यान दाखल करता येतील. येत्या २३ तारखेला छाननी होईल. येत्या २५ तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज मागं घेता येतील. त्याच दिवशी निवडणूक चिन्हांचं होईल. ५ नोव्हेंबरला सकाळी साडेसात ते संध्याकाळी साडेपाच या वेळेत मतदान, तर मतमोजणी ६ नोव्हेंबरला होईल. गडचिरोली आणि गोंदिया या नक्षलग्रस्त भागात सकाळी साडेसात ते दुपारी ३ वाजेपर्यंतच मतदानाची वेळ असेल. तिथं ७ नोव्हेंबरला मतमोजणी होईल.

**<><><><><><>**

राज्याच्या नऊ जिल्ह्यांमध्ये **सोयाबीनच्या** पिकावर पडलेल्या विषाणूजन्य रोगाच्या पार्श्वभूमीवर कृषी विभाग आणि मदत आणि पुनर्वसन विभागानं तातडीनं सोयाबीन पिकाचे पंचनामे सुरु करावेत असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मंत्रिमंडळ बैठकीत दिले. पाऊस आणि तापमानाच्या बदलत्या स्वरूपामुळे यंदा चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली, यवतमाळ, सोलापूर, लातूर, वाशिम,नांदेड या जिल्ह्यांत सोयाबीन पिकावर रोगाचा प्रादुर्भाव दिसत आहे. **राज्यात कृषी पंप** वीज जोडण्याचं काम वेगानं पूर्ण करण्यासाठी उच्च दाब वितरण प्रणाली योजनेला ३१ मार्च २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळ बैठकीत झाला. यंदाच्या दिवाळीत आनंदाचा शिधा उपक्रमात मैदा आणि पोह्याचा देखील समावेश करण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळ बैठकीत झाला. दरवर्षी २७ विद्यार्थ्यांना अल्पसंख्याक विद्यार्थी परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती योजनेचा लाभ दिला जाणार असून नागपूरमध्ये पाच अतिरिक्त कौटुंबिक न्यायालय स्थापन करून या ठिकाणी ४५ पदांनाही आज मंजुरी देण्यात आली. इमारतींच्या पुनर्विकासाला विरोध करणाऱ्या सदनिका मालकांच्या निष्कासनाबाबत अधिनियमात सुधारणा करायला मंत्रिमंडळ बैठकीत आज मंजुरी मिळाली.

**<><><><><><>**

वारकरी संप्रदायाच्या विविध मागण्यांसंदर्भात वारकरी महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी आज मंत्रालयात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. पंढरपूरचं विठ्ठल रुक्मिणी मंदिर हे शासनाच्या ताब्यातच रहावं, आळंदीतल्या वारकरी शिक्षण संस्थेत निवास, कीर्तन भवन, शिक्षण वर्ग, भजन हॉलकरता ४७

कोटी रुपयांचा निधी द्यावा, यासह विविध मागण्यांबाबत यावेळी चर्चा झाली. वारकरी बांधवांच्या मागण्यांबाबत राज्य शासन सकारात्मक असून त्याच्या पाठपुरावा करण्यासाठी मंत्री दादाजी भुसे समन्वयन करतील, असं मुख्यमंत्र्यांनी या शिष्टमंडळाला सांगितलं.

<><><><><>

यंदाच्या पावसाळ्यात राज्यात १ जूनपासून आतापर्यंत सुमारे १ हजार ११ मिलिमीटर सरासरी पावसाची नोंद झाली. राज्यात आतापर्यंत सरासरीच्या एकूण ९१ पूर्णांक ६ दशांश टक्के पाऊस झाला. ऑगस्टमध्ये सरासरीच्या ३८ टक्के पाऊस झाला असून सप्टेंबरमध्ये सरासरीच्या १२८ पूर्णांक ८ दशांश टक्के पाऊस पडला आहे. तर ऑक्टोबर महिन्यात आतापर्यंत सरासरी ७१ पूर्णांक १ दशांश मिलीमीटर पाऊस झाला आहे.

<><><><><>

प्रकाशाच्या अ◌ॅटोसेकंद प्लसविषयी केलेल्या संशोधनासाठी ३ शास्त्रज्ञांना यंदाचा भौतिकशास्त्रातला नोबेल पुरस्कार जाहीर झाला आहे. अमेरिकेचे पियरे अगोस्टिनी, जर्मनीचे फेरेंक क्रॉझ आणि स्वीडनचे ॲन ल्युलिअर या शास्त्रज्ञांना हा पुरस्कार मिळाला आहे. या पुरस्काराची घोषणा आज स्वीडनच्या रॉयल स्वीडिश अकादमी ऑफ सायन्सेसने केली. अत्यंत अत्यन्त वेगवान प्रक्रिया मोजण्यासाठी प्रकाशाच्या लहान प्लस निर्माण करण्याचा मार्ग त्यांनी या प्रयोगातून दाखवला.

<><><><><>

हांगझोऊ इथल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताची विजयी घोडदौड कायम आहे. स्पर्धेच्या दहाव्या दिवशी भारतानं आज दोन सुवर्ण, एक रौप्य आणि चार कांस्य पदकांची कमाई केली. त्यामुळे आतापर्यंत एकूण **६७** पदकं जिंकून पदक

तालिकेत भारत चौथ्या स्थानावर आहे. भालाफेकीत अन्नु राणी हिनं आणि ५ हजार मीटर शर्यतीत पारुल चौधरीनं सुवर्ण पदक पटकावलं. पुरुषांच्या 800 मीटर शर्यतीत मोहम्मद अफझलं यानं रौप्यपदक जिंकलं. महिलांच्या 400 मीटर अडथळ्यांच्या शर्यतीत, विथ्या रामराजनं, महिलांच्या 54 किलो वजनी गटाच्या मुष्टियुद्ध उपांत्य फेरीत प्रीती पवारनं कांस्यपदक जिंकलं. पुरुषांच्या कॅनो दुहेरी 1 हजार मीटरमध्ये, भारताच्या अर्जुन सिंग आणि सुनील सिंग सलाम यांनी कांस्यपदक जिंकलं.

**<><><><><><>**

धाराशिव जिल्हा परिषदेच्या स्वच्छ भारत मिशन कक्षाच्या वतीनं गावांचा घनकचरा आणि सांडपाणी निर्देशांक काढला जात आहे. त्याविषयी सविस्तर माहिती देणारा हा वृत्तांत....

**होल्ड- व्हॉईस कास्ट- देवीदास पाठक**

**<><><><><><>**

नाशिक जिल्ह्यात १४ दिवसांनंतर कांद्याचा लिलाव सुरु झाला आहे. लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत आज सकाळी कांद्याला सरासरी २ हजार रूपयांचा भाव मिळाला. अन्य बाजार समित्यांमध्ये देखील बाजार सुरळीत झाला. केंद्र शासनानं कांद्यावरचं निर्यात शुल्क रद्द करावं यासह विविध मागण्यांसा◌ाठी २० सप्टेंबरपासून कांदा व्यापारी संपावर होते. नाशिकचे पालकमंत्री दादा भुसे यांच्या उपस्थितीत काल व्यापारी प्रतिनिधींची बैठक झाली, बैठकींनंतर कांद्याचे लिलाव सुरू करण्याची तयारी व्यापाऱ्यांनी दर्शविली.

**//<><><><><><>//**